महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
पहिला मजला, मंत्रालय मुख्य इमारत,
मादाम कामा रोड,हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.

दूरध्वनी क्र २२७९३८०० Email ID : deskestrev.mu-mh@gov.in

क्रमांक : वैखदे-२०२६/१४६४/प्र.क्र.२६/मुद्रांक-१ **दिनांक : २०.०७.२०२६**

विषय :- वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मिळणेबाबत-
कै.गोविंद क-हाड, नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक

संदर्भ:- १) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. एमएजी २००५/९/ प्र.क्र.१/आरोग्य-३, दिनांक १९.०३.२००५.
२) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग बैठक २०१३/प्र. क्र. ३५३/१३/ राकावि-२, दि.०४.०४.२०१४.
३) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.वैखप्र-२०२२/प्र.क्र.१२०/ राकावि-२, दिनांक १७.०१.२०२३.
४) वैद्यकीय अधिक्षक, ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे यांचे पत्र क्र.ससरु/वै. अधि./वै. दे./५९०२/२०२४, दिनांक १७.१०.२०२४.
५) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि.१५.०७.२०२६ रोजीच्या टिप्पणीसोबत सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सचिव समितीच्या दि.१९.०६.२०२६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.
६) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दिनांक २१.११.२०२५ रोजीचे पत्र.

ज्ञापन:

कै. गोविंद कऱ्हाड, नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक हे UTI या आजारावरील उपचाराकरिता दि.१०/०७/२०२४ ते दि. १८/०७/२०२४ या कालावधीत दिनानाथ मंगेशकर हॉस्पीटल, पुणे येथे ॲडमिट होते. कै. कऱ्हाड यांना MD INDIA या Health Insurance कंपनीकडुन वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीसाठी मागणी केलेल्या रु.१,९७,०५०/- पैकी रक्कम रु.८०,४७२/- मंजूर झालेली असून आता उर्वरित रक्कम रु.१,१६,५७८/- पैकी रक्कम रु.१,१३,९७३ इतक्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीस एक विशेष बाब म्हणून मान्यता देण्याची विनंती नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांनी दि.२१.११.२०२५ रोजीच्या पत्रान्वये शासनाकडे केली.

०२. कै. गोविंद क-हाड, नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक यांचा "UTI" हा आजार शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक: शासन निर्णय एम.ए.जी.-२००५/९/प्र.क्र.१/आ-३, दि.१९.०३.२००५ (२७ आकस्मिक आजार) नुसार व शासन निर्णय क्रमांक, वैखप-२०२०/प्र.क्र.६६/राकावि-२, दि.१७.१२.२०२० नुसार अनुक्रमे भाग (१५) मध्ये येत असल्याचे वैद्यकीय अधिक्षक, ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे यांनी क्र.ससरु/वै.अधि./वै.दे./५९०२/२०२४, दिनांक १७.१०.२०२४ च्या पत्रान्वये प्रमाणित केले आहे.

०३. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि. ०४.०४.२०१४ अन्वये गठित केलेल्या वाजवी समितीसमोर प्रस्ताव सादर करण्यात आला. सदर समितीने दिलेल्या निर्णयानुसार सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक वैखप्र-२०२२/प्र.क्र.३५/राकावि-२, दि.१९.०७.२०२२ नुसार ना देय बाबींची वजाती करुन तसेच सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय दि. १९.०३.२००५ अन्वये देयकाची परिगणना करण्यात आली.

०४.	तद्नंतर, वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी मागणी केलेल्या रु.१,१३,९७३ इतक्या रकमेपैकी वाजवी समितीने दिलेल्या अभिप्रायानुसार ना-देय बाबींची वजाती करून रु.१४,४४४.००/- (रुपये चौदा हजार चारशे चव्वेचाळीस फक्त) इतक्या वैद्यकीय खर्चाच्या रकमेस "एक विशेष बाब" म्हणून मंजूरी देण्याची विनंती सार्वजनिक आरोग्य विभागास करण्यात आली. सदर प्रस्ताव सार्वजनिक आरोग्य विभागाने त्यांच्या सचिव समितीच्या दिनांक १९.०६.२०२६ रोजीच्या बैठकीत सादर केला.

०५.	सदर बैठकीमध्ये कै.गोविंद क-हाड, नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक यांना त्यांच्या "UTI" या आजारपणावरील उपचाराकरिता "दिनानाथ मंगेशकर हॉस्पीटल, पुणे" या खाजगी रुग्णालयात दि.१०.०७.२०२४ ते दि. १८.०७.२०२४ या कालावधीत आंतररुग्ण म्हणून घेतलेल्या औषधोपचाराचे रु.१,९७,०५०/- पैकी Health Insurance कंपनीने मंजूर केलेली रक्कम रु.८०,४७२/- वगळता मागणी केलेली रु.१,१६,५७८/- पैकी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वाजवी समितीने दिनांक २५.०३.२०२६ रोजीच्या बैठकीमध्ये दिलेल्या निर्णयानुसार तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सचिव समितीने दि.१९.०६.२०२६ रोजीच्या बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयानुसार "एक विशेष बाब" म्हणून रु.१४,४४४.००/- (रुपये चौदा हजार चारशे चव्वेचाळीस फक्त) इतक्या रक्कमेच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीस अटींच्या अधिन राहून मान्यता दिली आहे.

०६.	सार्वजनिक आरोग्य विभाग दिनांक ०४.०४.२०१४ अन्वये गठीत केलेल्या वाजवी समितीने दिलेल्या निर्णयानुसार परिगणना तक्ता पुढीलप्रमाणे आहे :-

वैद्यकीय देयकाची परिगणना

<table>
<tr><th></th><th>कालावधी</th><th>अर्जदारासाठी प्रत्यक्ष खर्च व करण्यात आलेली मागणी</th><th>अनुज्ञेय असणारी प्रतिपूर्तीची टक्केवारी</th><th>परिगणना करुन अनुज्ञेय रक्कम</th></tr>
<tr><td>अर्जदारा साठी मागणी</td><td>दि.१०.०७.२०२४ ते
दि.१ ८.०७.२०२४</td><td>मूळ देयक - रु. १९७०५०.००/-
Mediclaim - रु. ८०,४७२.००/-

रु. ११६५७८.००/-
Concession- रु. १५७६४.००/-

रु. १००८१४.००/-
Dietary charges +रु.२३४५.००

रु. १०३१५९.००/-
medicine list as
per D form
part B + रु. १०८१४.८३/-

एकूण मागणी रु.११३९७३.८३/-</td><td>--</td><td>--</td></tr>
<tr><td colspan="5">अ) औषधोपचारावरील खर्चाची परिगणना (वास्तव्याच्या खर्च वगळून)</td></tr>
<tr><td colspan="2">(११३९७३.८३- ८१०००= रु.३२,९७३.८३)
I) औषधोपचारावरील अनुज्ञेय नसलेला खर्च (शासन निर्णय दि.१९.०७.२०२२ मध्ये नमूद केलेल्या नादेय बाबी वजाती केलेली रक्कम)
<table><tr><th>अ.क्र .</th><th>तपशिल</th><th>रुपये</th></tr><tr><td>१</td><td>easy bath XL wipes १० s ११५७२४२५/९३२१९ दि.१२.०७.२०२४</td><td>२००.००</td></tr><tr><td></td><td>एकूण</td><td>रु. २००.००</td></tr></table></td><td>रु.३२,९७३.८३
रु. २६९२५.००

रु. ६०४८.८३</td><td>९० %</td><td>रु.५४४४.००
(५४४३.९४)</td></tr>
</table>

II) इतर अनुज्ञेय नसलेला खर्च

अ क्र.	तपशिल	रुपये
१	Procedure charges ४०९५२४२५/६१२ दि.१८.०७.२०२४	८८०.००
२	Other charges BMW ४०९५२४२५/६१२ दि.१८.०७.२०२४	२००.००
३	Dietary Charges ५०९५२४२५/१२९७ दि.१८.०७.२०२४	२३४५.००
	एकूण	**रु. ३४२५.००**

III) वाजवी समितीने दिलेल्या अभिप्रायानुसार डॉक्टर व्हिजीट फी बाबत अनुज्ञेय नसलेला खर्च

मागणी ४०९५२४२५/६१२ दि.१८.०७.२०२४		**वाजवी समितीने दिलेल्या निर्णयानुसार अनुज्ञेय खर्च**	**अनुज्ञेय नसलेला खर्च**
routine visit १	९६००	५००.००	९१००.००
routine visit H	९६००	५००.००	९१००.००
routine visit २	५६००	५००.००	५१००.००
		एकूण	**रु.२३३००.०**

एकूण अनुज्ञेय नसलेला खर्च	
I)	**रु.२००.००**
II)	**रु.३४२५.००**
III)	**रु.२३३००.००**
एकूण	**रु.२६९२५.००**

				एकूण (अ)	**रु.५४४४.००**
ब) आंतररुग्ण म्हणून रुग्णालयातील वास्तव्याचा अनुज्ञेय नसलेला खर्च					
वास्तव्याचा प्रकार	**दिनांक/दिवस**	**मागणी केलेली रक्कम**	**वाजवी समितीने दिलेल्या निर्णयानुसार अनुज्ञेय रक्कम**	--	
बाथरुमसह डबल बेडेड कक्ष (प्रायव्हेट स्पे. रुम)	१०.०७.२०२४ ते १८.०७.२०२४	९००० X ९ = ८१०००	१००० X ९ = ९०००	--	**रु.९०००.००**
				एकूण (ब)	**रु.९०००.००**
				एकूण	**रु.१४,४४४.००**

०७.	कै.गोविंद क-हाड, नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक यांच्या "UTI" या आजारपणावरील उपचाराकरिता दि.१०/०७/२०२४ ते दि. १८/०७/२०२४ या कालावधीत आंतररुग्ण म्हणून "दिनानाथ मंगेशकर हॉस्पीटल, पुणे" या खाजगी रुग्णालयात घेतलेल्या उपचारार्थ रु.१,९७,०५०/- पैकी Health Insurance कंपनीने मंजूर रक्कम रु.८०,४७२/- वगळता मागणी केलेली रु.१,१६,५७८/- पैकी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सचिव समितीने दि.१९.०६.२०२६ रोजीच्या बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयानुसार "एक विशेष बाब" म्हणून रु.१४,४४४.००/- (रुपये चौदा हजार चारशे चव्वेचाळीस फक्त) इतक्या रक्कमेच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीस या ज्ञापनान्वये शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

०८.	उपरोक्त प्रमाणे अनुज्ञेय ठरविण्यात आलेली वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्तीची रक्कम पुढील अटी व शर्तींच्या अधिन राहील.

अ) मंजूर करण्यात आलेल्या प्रतिपूर्तीची रक्कम ही सर्व नियम, आदेशातील इतर सर्व इतर सर्व तरतूदींच्या अधिन राहील.

ब) प्रस्तुत प्रकरणी वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मिळण्याकरीता कोणत्याही विमा कंपनीकडे दावा केलेला नाही, वा देयकाची रक्कम अन्य धर्मदाय संस्था/ट्रस्ट कडुन आहरित केलेली नाही याबाबतचे शपथपत्र (affidavit) देयकासोबत अदायगीच्यावेळी जोडणे बंधनकारक राहील.

क) वरीलप्रमाणे प्रतिपूर्तीची परिगणना करण्यात आली असली तरी महाराष्ट्र राज्यसेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ मधील नियम क्र. ३ (आठ), ११ (१) व (२) मधील तरतुदी नुसार अंतिम रक्कम अदा करण्यापूर्वी पुन्हा एकदा देयकातील अनुज्ञेय नसलेल्या बाबींची फेरतपासणी करून अनुज्ञेय नसलेला खर्च वगळण्याची दक्षता नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी घ्यावी.

ड) सदरचा खर्च "मागणी क्र.सी-२,२०३०-(००)(०१) नोंदणी महानिरीक्षक व जिल्हा निबंधक (अनिवार्य) - (२०३००१०९ ०१ वेतन) या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकावा व तो चालू आर्थिक वर्षाच्या मंजुर तरतुदीतून भागविण्यात यावा.

ई) या प्रकरणी अतिप्रदान झाल्याची बाब निदर्शनास आल्यास, मंजूर केलेली प्रतिपूर्तीची रक्कम संबंधितांकडून वसूल करण्याचे आदेश शासन देईल.

०९.	सदर शासन ज्ञापन, सार्वजनिक आरोग्य विभाग/रूशआ-२ यांच्या E-१७०१४४०, दि.२६.०६.२०२६ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संकेतांक २०२६०७२०१५४५०२६०४८ असा आहे. हे आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SATYANARAYAN SHIVPRASAD BAJAJ

Digitally signed by SATYANARAYAN SHIVPRASAD BAJAJ
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT,
2.5.4.20=559498df564ab1121a356349085c1b8e3cc0f12569ba0f7f2090386d4dccb333, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=F7145AF5949FB706E2DCB06C2B209B58FFA369F6E085E02041722C90F0528791, cn=SATYANARAYAN SHIVPRASAD BAJAJ
Date: 2026.07.20 15:45:57 +05'30'

(सत्यनारायण बजाज)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे (मूळ वैद्यकीय देयकासह) (दोन प्रती)
२) कै.गोविंद क-हाड यांच्या पत्नी श्रीम. प्रतिभा गोविंद क-हाड. (द्वारा नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे)

प्रत: **माहितीसाठी व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित**

१) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, (लेखापरीक्षा)/ (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई.
२) जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, पुणे.
३) अवर सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग (रूशआ-२), मंत्रालय, मुंबई.
४) मुद्रांक-१ कार्यासन, निवडनस्ती, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई